# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता 5 वी), फेब्रुवारी 2024

**बैठक क्र.** | | | | | | | | | | | |

**संच A**

**0 1 0 1**

**पेपर क्र. - I**

**वेळ : 11:00 ते 12:30**

## माध्यम : मराठी

**एकूण गुण : 150**

## प्रथम भाषा व गणित

**पृष्ठ : 32**

**प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

(1) या प्रश्नपत्रिकेत **दोन** विभाग आहेत. त्यापैकी विभाग **I** मध्ये प्रथम भाषा विषयासाठी **1** ते **25** व विभाग **II** मध्ये गणित विषयासाठी **26** ते **75** असे एकूण **75** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) प्रत्येक प्रश्नासाठी **2** गुण आहेत.

(3) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एकूण **90** मिनिटांचा कालावधी दिला जाईल.

(4) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नक्रमांकासमोर चार पर्यायासाठी क्रमागत वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले वर्तूळ पुढील उदाहरणात दाखविल्याप्रमाणे रंगवा. उदा. प्रश्न क्र. **6** च्या बरोबर उत्तराचा पर्याय क्र. **2** असेल, तर तो पुढीलप्रमाणे नोंदवावा.
प्रश्न क्र. **6** ① ● ③ ④

(5) खालीलप्रमाणे नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. असे उत्तर नोंदविल्यास त्या प्रश्नास 'शून्य' गुण दिले जातील. ✓ ② ⊙ ④

(6) प्रत्येक प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, खाडाखोड करून नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(7) एकदा नोंदविलेली उत्तरे पुन्हा बदलता येणार नाहीत.

(8) पर्यायाची उत्तरे नोंदविताना फक्त काळ्या किंवा निळ्या रंगाच्या बॉलपेनचाच वापर करावा. पेन्सिलने नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(9) प्रश्नपत्रिकेत प्रत्येक पानावर खाली व शेवटच्या पानावर कच्चे काम करण्यासाठी मोकळी जागा आहे, तेथेच कच्चे काम करावे.

(10) परीक्षेस मर्यादित वेळ असल्याने एखाद्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला येत नसल्यास पुढील प्रश्न सोडवा. शेवटी वेळ शिल्लक राहिल्यास उरलेल्या प्रश्नांसाठी पुन्हा प्रयत्न करावा.

(11) एखाद्या प्रश्नात त्रुटी/चूक आढळल्यास त्याबाबत पर्यवेक्षक किंवा परीक्षा केंद्रसंचालक यांच्याकडे विचारणा करू नये.

(12) प्रश्नातील त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन शाळेने किंवा पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात न पाठवता संबंधित शाळेच्या लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीनेच पाठवावे.

(13) त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन ऑनलाईन पद्धतीने पाठविण्याची मुदत परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची प्रसिद्ध झाल्यापासून 10 (दहा) दिवसांपर्यंत राहील.

(14) मुद्रणदोष किंवा अन्य कारणांमुळे प्रश्न चुकीचा असल्याचे आढळल्यास तज्ञ समितीच्या अभिप्रायानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल.

(15) मूळ माध्यमासोबत इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका दिलेली आहे. मूळ माध्यमातील संदिग्ध प्रश्नांबाबत इंग्रजी प्रश्न पहावेत.

## विभाग - I

**मराठी**


**01.** पुढील आकृतीत असलेल्या अक्षरांपासून तयार होणाऱ्या अर्थपूर्ण म्हणीतील चौथ्या अक्षराचा पर्याय निवडा.

(1) व

(2) बा

(3) दे

(4) मु




**02.** 'सिस्टीम' या शब्दाला पर्यायी मराठी शब्द कोणता?

(1) जोडणी (2) प्रणाली (3) वापरकर्ता (4) माहिती

**प्रश्न क्र. 03 ते 05 साठी सूचना –**

पुढील सुसंगत वाक्यांचा परिच्छेद अर्थपूर्ण होण्यासाठी दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडा.

**03.** सर्व विद्यार्थी ............ जमले होते.

(1) नाट्यगृहात (2) किल्ल्यावर

(3) सभागृहात (4) सर्कशीच्या तंबूत

**04.** तेथे सर्वांनी ............

(1) रोमहर्षक कसरती पाहिल्या. (2) योगसाधना केली.

(3) बुरूजाची पाहणी केली. (4) नाटुकले पाहिले.

**05.** निमित्त होते 21 जून रोजी साजरा होणाऱ्या जागतिक ............

(1) नाट्यदिनाचे (2) बालदिनाचे

(3) पर्यावरण दिनाचे (4) योगदिनाचे

**कच्च्या कामासाठी फक्त**

**06.** पुढे दिलेल्या शब्दसमूहाबद्दल एक अचूक शब्द पर्यायांतून निवडा.
मोजक्या शब्दात सांगितलेले तत्त्व -

(1) मंत्र (2) सूत्र
(3) तंत्र (4) यंत्र

**07.** खालील शब्द वर्णानुक्रमे लावल्यास मध्यभागी येणाऱ्या शब्दाचा पर्याय निवडा.
नजर, वजन, जरब, नगर, गरज, गजरा, चरण

(1) नगर (2) वजन
(3) जरब (4) नजर

**08.** जसे, गंजी-गवताची, तसे ........... - धान्याची.

(1) चळत (2) रास
(3) जाळी (4) जुडी

**09.** खालीलपैकी 'आरती प्रभू' म्हणून कोणास संबोधले जाते?

(1) यशवंत दिनकर पेंढारकर (2) चिंतामण त्र्यंबक खानोलकर
(3) आत्माराम रावजी देशपांडे (4) माणिक शंकर गोडघाटे

**10.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचा विरूद्धार्थी शब्द पर्यायांतून निवडा.
राधाची बाहुली <u>बोलकी</u> आहे.

(1) बहिरा (2) शांत
(3) बडबडी (4) अबोल

**11.** पुढीलपैकी प्राणी व त्यांचा निवारा यांची चुकीची जोडी ओळखा.

(1) कोळी-घरटे (2) सिंह-गुहा
(3) साप-बीळ (4) घोडा-तबेला

**कच्च्या कामासाठी फक्त**

**12.** खालीलपैकी कोणत्या पर्यायांतील अक्षरे घेतल्यास सर्व उभे अर्थपूर्ण शब्द तयार होतील?

| | | | |
|---|---|---|---|
| – | – | – | – |
| द | द | द | द |
| न | न | न | न |

(1) वा, स, रू, पा
(2) स्पं, वा, रू, स
(3) गो, वा, न, स्पं
(4) वं, सा, र, व

**13.** पुढीलपैकी कोणत्या पर्यायांतील शब्द दिलेल्या सर्व अर्थांनी वापरला जात नाही?

(1) प्रतिमा – प्रतिबिंब, चित्र
(2) भाव – दर, भक्ती
(3) वर्ण – रंग, मूळध्वनी
(4) वास – गंध, अवसर

**प्रश्न क्र. 14 ते 16 साठी सूचना –**

**खालील उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा.**

साबणाने शरीर स्वच्छ होते; परंतु मनामध्ये वाईट विचार असतील, खोटे बोलण्याची सवय असेल, दुसऱ्यांना फसवण्याची, लुबाडण्याची संधी आपण शोधत असू किंवा चहाडी, टवाळी आणि टिंगल करण्याची सवय असेल, त्याने कितीही साबण लावून शरीर घासून घासून स्वच्छ केले, तरी त्याचे जीवन निर्मळ होऊ शकत नाही, कारण त्याचे चित्त शुद्ध नाही आणि म्हणूनच त्याला कितीही उद्‌बोधक विचार पटवून देण्याचा प्रयत्न केला, तरी त्याला ते पटत नाहीत. गळी उतरत नाहीत. जसे वसंत ऋतू आल्यावर वृक्ष आपोआप फळांनी बहरतात, पण एखाद्या वृक्षाला फळेच येत नसतील, तर वसंत ऋतू येऊनही त्या वृक्षाला त्याचा उपयोग नसतो. प्राण गेलेले शरीर कोणतीही क्रिया वा व्यवहार करू शकत नाही. पाण्याशिवाय शेतामध्ये पीक येऊ शकत नाही. साबण आपले शरीर स्वच्छ करू शकतो; पण आपले जीवन निर्मळ करू शकत नाही.

<u>**कच्च्या कामासाठी फक्त**</u>

**14.** एखाद्याचे जीवन केव्हा निर्मळ होऊ शकेल?

(1) त्याच्या मनात वाईट विचार असतील तर

(2) त्याला टिंगल-टवाळी करण्याची सवय असेल तर

(3) तो दुसऱ्यांना लुबाडण्याची संधी शोधत असेल तर

(4) त्याचे चित्त शुद्ध असेल तर

**15.** 'पटवून देणे' या अर्थाचा कोणता वाक्प्रचार उताऱ्यात आला आहे?

(1) संधी शोधणे. (2) गळी उतरवणे.

(3) चहाडी करणे. (4) बहरणे.

**16.** खालीलपैकी कोणते उदाहरण उताऱ्यात आले नाही?

(1) वृक्षाला फळेच येत नसतील, तर वसंत ऋतूचाही उपयोग होत नाही.

(2) चित्त शुद्ध नसेल, तर उद्‌बोधक विचार पटत नाहीत.

(3) साबण शरीर स्वच्छ करतो, तर पाण्याने मन स्वच्छ होते.

(4) प्राण नसलेले शरीर कोणतेही व्यवहार करू शकत नाही.

**कच्च्या कामासाठी फक्त**

**प्रश्न क्र. 17 ते 19 साठी सूचना –**

पुढील जाहिरातीचे लक्षपूर्वक निरीक्षण करून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायातून निवडा:

**सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!! सुवर्णसंधी!!!**

प्रवेश मर्यादित...

**भाषाप्रेमी मंडळ**

आयोजित

**वयोगट 5 ते 13 वर्ष**

**'सुंदर हस्ताक्षर मार्गदर्शन वर्ग'**

तुमच्या लेखनाला गती नाही? अक्षर वळणदार येत नाही?
तर पर्याय एकच...

**सुंदर हस्ताक्षर मार्गदर्शन वर्ग प्रवेशासाठी आजच नाव नोंदणी करा.**

**माफक फी**

**आमची वैशिष्ट्ये –**

- तज्ज्ञ मार्गदर्शक
- भरपूर लेखनाचा सराव
- सरावासाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध
- सुसज्ज वातानुकूलित प्रशिक्षण वर्ग

* **स्थळ :** 12, गुरुवार पेठ, सातारा.
* **मार्गदर्शन वर्गाची वेळ :** सकाळी 7.00 ते 10.00 वा.

**17.** 'सुंदर हस्ताक्षर वर्गाचे' पुढीलपैकी कोणते वैशिष्ट्य नाही?

(1) परवडणारी फी.　　(2) दिवसभर मार्गदर्शन.

(3) भरपूर लेखन सराव.　　(4) सुसज्ज वातानुकूलित प्रशिक्षण वर्ग.

**18.** सुंदर हस्ताक्षरातील सर्वाधिक सुधारणा कोणत्या वयोगटात होईल?

(1) 8 वी ते 10 वी　　(2) 10 वी ते 12 वी

(3) फक्त माध्यमिक　　(4) शिशु वर्ग ते 7 वी

**कच्च्या कामासाठी फक्त**

19. 'सुंदर हस्ताक्षर मार्गदर्शन वर्ग' कोणी आयोजित केला आहे?

(1) तज्ज्ञ मार्गदर्शक (2) 5 ते 13 वर्ष वयोगटातील विद्‌यार्थी
(3) भाषाप्रेमी मंडळ (4) सातारा जिल्हा

20. 'रेखीव रांगोळी अंगणात शोभून दिसते.' वरील वाक्यात विशेष्य कोणते?

(1) रेखीव (2) अंगण (3) रांगोळी (4) शोभून

21. दिलेल्या पर्यायांमधील निश्चितपणे एकवचनी नसलेला शब्द कोणता?

(1) हरिण (2) वाघ (3) ससा (4) चित्ता

22. खालील वाक्यात कोणते विरामचिन्ह द्‌यायचे राहिले आहे?
'प्रथमेश मुंबईला गेला पण त्याचे काम झालेच नाही.'

(1) पूर्णविराम (2) उद्‌गारचिन्ह (3) स्वल्पविराम (4) अर्धविराम

23. खालीलपैकी भूतकाळी वाक्याचा पर्याय निवडा.

(1) ती नाचत असते. (2) ती नाचत जाईल.
(3) मी नदीकाठी खेळत असे. (4) तो नेहमीच उशिरा उठतो.

24. पुढील पर्यायांतून शुद्‌ध शब्द ओळखा.

(1) क्रिडामहोत्सव (2) औद्‌योगिक (3) नैतीक (4) राष्ट्रकूल

25. खालील वाक्याचा अर्थ पूर्ण करण्यासाठी योग्य वाक्प्रचार पर्यायांतून निवडा.
ताटातील सुग्रास जेवण पाहून प्राचीच्या ............

(1) तोंडचे पाणी पळणे (2) तोंडाला पाने पुसणे
(3) तोंडाला पाणी सुटणे (4) तोंडचा घास काढणे

**कच्च्या कामासाठी फक्त**

## SECTION - II

## MATHEMATICS

**26.** Which of the following statements is false?

(1) Cuboid is three dimensional.

(2) Cuboid has 12 edges.

(3) All surfaces of a cuboid are square in shape.


(4) Length, breadth and height of a cuboid can be measured.

**27.** How will you write twenty two thousand two hundred and fifty in international number system?

(1) 22150 (2) २२१५०

(3) २२२५० (4) 22250

**28.** What is the perimeter of the adjacent figure?




(1) 16 cm (2) 36 cm

(3) 18 cm (4) 30 cm

**SPACE FOR ROUGH WORK**

## विभाग - II

**गणित**

**26.** खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(1) इष्टिकाचिती त्रिमितीय असते.

(2) इष्टिकाचितीला 12 कडा असतात.

(3) इष्टिकाचितीची सर्व पृष्ठे चौरसाकृतीच असतात.


(4) इष्टिकाचितीची लांबी, रूंदी व उंची मोजता येते.

**27.** 'सव्वा बावीस हजार' ही संख्या आंतरराष्ट्रीय संख्या चिन्हात कशी लिहाल?

(1) 22150 (2) २२१५०

(3) २२२५० (4) 22250

**28.** खालील आकृतीची परिमिती किती सेमी आहे?




(1) 16 सेमी (2) 36 सेमी

(3) 18 सेमी (4) 30 सेमी

**कच्च्या कामासाठी फक्त**

**29.** Dilip purchased a motorcycle for Rs. 35900. He spent Rs. 3780 on its repairs. After some days, he sold the motorcycle for Rs. 40750. How much profit did he make in this transaction?

(1) Rs. 1070
(2) Rs. 4850
(3) Rs. 36970
(4) Rs. 32120

**30.** At a ration shop, 85 sacks of wheat, 50 sacks of rice and 15 sacks of tur dal was available for sale. If every sack contained 40 kg of grains, How much grains in kilograms, were available for sale?

(1) 150 kg
(2) 600 kg
(3) 6000 kg
(4) 4000 kg

**31.** Which amongst > , < or = will be appropriate to fill in the boxes between, the below given fractions.

$\frac{3}{4} \ \square \ \frac{6}{8} \ \square \ \frac{7}{9}$

(1) = , >
(2) < , <
(3) > , <
(4) = , <

**32.** Pick out the wrong statement from the given statements.

(1) The product of any number and zero is zero.
(2) Multiplication of odd number with other odd number results in even number.
(3) Multiplicant × Multiplier = 0. Then either Multiplicant or Multiplier is zero.
(4) When same digit appears at the one's place in two numbers then 8 will not appear in one's place of their product.

**SPACE FOR ROUGH WORK**

**29.** दिलीपने 35900 रूपयाला एक मोटारसायकल खरेदी केली. तिच्या दुरुस्तीसाठी 3780 रूपये खर्च केला. काही दिवसांनी दिलीपने ती मोटारसायकल 40750 रूपयाला विकली. तर त्याला या व्यवहारात किती नफा झाला?

(1) 1070 रूपये (2) 4850 रूपये

(3) 36970 रूपये (4) 32120 रूपये

**30.** एका स्वस्त धान्याच्या दुकानात 85 पोती गहू, 50 पोती तांदूळ, 15 पोती तूरडाळ विक्रीसाठी आले. जर प्रत्येक पोत्यात 40 किग्रॅ धान्य असेल तर त्या स्वस्त धान्याच्या दुकानात एकूण किती किग्रॅ धान्य विक्रीसाठी आले?

(1) 150 किग्रॅ (2) 600 किग्रॅ

(3) 6000 किग्रॅ (4) 4000 किग्रॅ

**31.** खालील अपूर्णांकांच्या जोड्यामधील चौकटीत > , < किंवा = यापैकी कोणती चिन्ह योग्य ठरतील?

$\frac{3}{4} \ \square \ \frac{6}{8} \ \square \ \frac{7}{9}$

(1) = , > (2) < , <

(3) > , < (4) = , <

**32.** दिलेल्या विधानापैकी चुकीचे विधान ओळखा.

(1) कोणतीही संख्या व शून्य यांचा गुणाकार शून्य येतो.

(2) कोणत्याही विषम संख्येला विषम संख्येने गुणले असता उत्तर सम संख्या मिळते.

(3) गुण्य × गुणक = 0 असेल तर गुण्य किंवा गुणक शून्य असतील.

(4) कोणत्याही दोन संख्यांच्या एककस्थानी समान अंक असल्यास गुणाकाराच्या एककस्थानी 8 हा अंक येणार नाही.

**कच्च्या कामासाठी फक्त**

**33.** Roshni needed 1 hr. 30 min. to travel from Nagpur to Wardha. She took rest for 15 min. She completed Wardha to Yavatmal distance journey in 1 hr. 50 min. If Roshni had started from Nagpur at 10 in the morning then at what time will she reach Yavatmal?

(1) 20 min. past 1 (2) 35 min. past 3

(3) 35 min. past 1 (4) 35 min. past 12

**34.** The labour charge to paint a rectangular wall at the rate of Rs. 45 per sq.m. is Rs. 2700. If the length of the wall is 15 m, what must be the breadth of the wall?

(1) 3 m (2) 180 m

(3) 60 m (4) 4 m

**35.** 12 kg + 1350 gm = How much?

(1) 1362 kg (2) 1362 gm

(3) 13.350 kg (4) 13.350 gm

**36.** Yogesh received Rs. 72 and 5 paisa as interest on his deposits in bank. How will you write this in decimal form?

(1) Rs. 72.05 (2) Rs. 72.5

(3) Rs. 72.50 (4) Rs. 72.005

**37.** A merchant bought 300 sacks of wheat at Rs. 2500 per quintal. Due to heavy rains, 70 sacks of grains were destroyed. He sold the remaining sacks at the rate of Rs. 2700 per quintal. How much profit or loss did he make in this transaction?

(1) Rs. 60000 profit (2) Rs. 129000 loss

(3) Rs. 175000 loss (4) Rs. 46000 profit

**SPACE FOR ROUGH WORK**

**33.** रोशनीला नागपूर ते वर्धा या प्रवासासाठी 1 तास 30 मिनिटे लागली. 15 मिनिटांची विश्रांती घेऊन तिने वर्धा ते यवतमाळ हा प्रवास 1 तास 50 मिनिटांत पूर्ण केला. जर रोशनी सकाळी 10 वाजता नागपूरहून निघाली असेल तर ती यवतमाळला किती वाजता पोहचेल?

(1) 1 वा 20 मि.
(2) 3 वा 35 मि.
(3) 1 वा 35 मि.
(4) 12 वा 35 मि.

**34.** एका आयताकृती भिंतीला रंग देण्यासाठी 45 रूपये प्रती चौरसमीटर दराने 2700 रूपये मजूरी द्यावी लागते. जर भिंतीची लांबी 15 मीटर असल्यास त्या भिंतीची रूंदी किती मीटर असेल?

(1) 3 मीटर
(2) 180 मीटर
(3) 60 मीटर
(4) 4 मीटर

**35.** 12 किग्रॅ + 1350 ग्रॅम = किती?

(1) 1362 किग्रॅ
(2) 1362 ग्रॅम
(3) 13.350 किग्रॅ
(4) 13.350 ग्रॅम

**36.** योगेशला बँकेतील ठेवीवर बाहत्तर रूपये पाच पैसे व्याज मिळाले तर ही संख्या दशांश पद्धतीत कशा प्रकारे लिहीता येईल?

(1) 72.05 रूपये
(2) 72.5 रूपये
(3) 72.50 रूपये
(4) 72.005 रूपये

**37.** एका व्यापाऱ्याने 2500 प्रती क्विंटल दराने गव्हाचे 300 पोती घेतली. अतीवृष्टीमुळे त्यापैकी 70 पोती धान्य खराब झाले. उर्वरित गव्हाची पोती त्याने 2700 रूपये प्रति क्विंटल दराने विकली. तर त्याला या व्यवहारात नफा झाला की तोटा व किती?

(1) 60000 रूपये नफा
(2) 129000 रूपये तोटा
(3) 175000 रूपये तोटा
(4) 46000 रूपये नफा

**कच्च्या कामासाठी फक्त**

**38.** For flood victims at Kolhapur, 5 social organisations contributed Rs. 12870, Rs. 13850, Rs. 9640, Rs. 25390, Rs. 7450 respectively. How much total relief fund was collected?

(1) Rs. 126250 (2) Rs. 222910

(3) Rs. 66750 (4) Rs. 69200

**39.** During a 3 day Drama festival, at the auditorium, out of 1250 seats, 12% seats remained vacant on the first day, 10% seats were vacant on second day and on third day 4% seats remained vacant. How many seats remained vacant in total, during the three days?

(1) 150 (2) 250

(3) 325 (4) 350

**40.** If 15$^{th}$ March is Monday, then which day will occur 5 times, in that month?

(1) Thursday (2) Wednesday

(3) Friday (4) Saturday

**41.** If the radius of a circle is $\frac{7}{2}$ cm, then what is its diameter in cms?

(1) 3.5 cm (2) 14 cm

(3) 3.5 m (4) 7 cm

**42.** The numbers 78312, 78135, 78351 and 78531 are arranged in descending order. What will be the sum of the 1$^{st}$ number and 3$^{rd}$ number from the right side?

(1) 156882 (2) 156447

(3) 156843 (4) 156446

**SPACE FOR ROUGH WORK**

**38.** कोल्हापूरातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पाच सेवाभावी संघटनांनी अनुक्रमे ₹12870, ₹13850, ₹9640, ₹25390, ₹7450, ची मदत केली. तर एकूण किती रूपये मदत निधी जमा झाला?

(1) 126250 रूपये
(2) 222910 रूपये
(3) 66750 रूपये
(4) 69200 रूपये

**39.** तीन दिवसीय नाट्य महोत्सवात नाट्य सभागृहाच्या 1250 आसनापैकी पहिल्या दिवशी 12%, दुसऱ्या दिवशी 10% व तिसऱ्या दिवशी 4% आसने रिकामी राहिली तर तीन दिवसात एकूण किती आसने रिकामी राहिली?

(1) 150
(2) 250
(3) 325
(4) 350

**40.** 15 मार्चला सोमवार आहे तर त्या महिन्यात कोणता वार पाच वेळा येईल?

(1) गुरुवार
(2) बुधवार
(3) शुक्रवार
(4) शनिवार

**41.** एका वर्तुळाची त्रिज्या $\frac{7}{2}$ सेमी आहे. तर त्याचा व्यास किती सेमी आहे?

(1) 3.5 सेमी
(2) 14 सेमी
(3) 3.5 मी
(4) 7 सेमी

**42.** 78312, 78135, 78351, 78531 या संख्या उतरत्या क्रमाने लावल्यास त्यातील पहिली व उजवीकडून तिसरी असणाऱ्या संख्यांची बेरीज किती?

(1) 156882
(2) 156447
(3) 156843
(4) 156446

**कच्च्या कामासाठी फक्त**

**43.** Fifteen litres two hundred ml. – Thirteen litres five hundred and thirty ml. = How much?

(1) Two litres six hundred and seventy ml.

(2) 1.670 ml.

(3) One litre six hundred and seventy ml.

(4) 2.670 ml.

**44.** Which of the following is completely divisible by 3?

(1) 7553
(2) 1733
(3) 2352
(4) 9851

**45.** Which of the following expressions is equivalent to the fraction $\frac{14}{35}$?

(1) $\frac{3}{7} - \frac{2}{7}$
(2) $\frac{8}{5} - \frac{6}{5}$
(3) $\frac{4}{5} + \frac{3}{5}$
(4) $\frac{5}{7} + \frac{2}{7}$

**46.** Pranav wants to buy a plot for Rs. 2417300 but he has Rs. 712300 with him. He will have to arrange the remaining amount from bank loan. How much amount should he borrow as loan?

(1) Rs. Seventeen lakhs five thousand

(2) Rs. Seventeen lakhs fifty thousand

(3) Rs. Seventeen lakhs

(4) Rs. Seventeen lakhs five thousand and three hundred

**47.** 12 hours 18 min. – 6 hrs. 45 min. = how much?

(1) 5 hrs. 73 min.
(2) 5 hrs. 33 min.
(3) 5 hrs. 78 min.
(4) 6 hrs. 27 min.

**SPACE FOR ROUGH WORK**

**43.** पंधरा लीटर दोनशे मिली – तेरा लीटर पाचशे तीस मिली = किती?

(1) दोन लीटर सहाशे सत्तर मिली

(2) 1.670 मिली

(3) एक लीटर सहाशे सत्तर मिली

(4) 2.670 मिली

**44.** खालीलपैकी कोणत्या संख्येला तीनने नि:शेष भाग जातो?

(1) 7553 (2) 1733

(3) 2352 (4) 9851

**45.** $\frac{14}{35}$ हा अपूर्णांक कोणत्या पर्यायाचा सममूल्य अपूर्णांक आहे?

(1) $\frac{3}{7}-\frac{2}{7}$ (2) $\frac{8}{5}-\frac{6}{5}$

(3) $\frac{4}{5}+\frac{3}{5}$ (4) $\frac{5}{7}+\frac{2}{7}$

**46.** प्रणवला 2417300 रूपयाचा प्लॉट खरेदी करायचा आहे. पण त्याच्याजवळ 712300 रूपये आहेत. उर्वरित रक्कम त्याला बँकेतून कर्ज घ्यावयाचे आहे. तर त्याला किती रक्कम कर्ज घ्यावे लागेल?

(1) सतरा लाख पाच हजार

(2) सतरा लाख पन्नास हजार

(3) सतरा लाख

(4) सतरा लाख पाच हजार तीनशे

**47.** 12 तास 18 मि. – 6 तास 45 मि. = किती?

(1) 5 तास 73 मि. (2) 5 तास 33 मि.

(3) 5 तास 78 मि. (4) 6 तास 27 मि.

**कच्च्या कामासाठी फक्त**

**48.** What is the sum of all the divisors of 90?

(1) 233 (2) 228

(3) 204 (4) 234

**49.** If the fractions are arranged in ascending order, what will be double of the fraction at the second last place?

$\frac{1}{4}$ , $\frac{1}{7}$ , $\frac{1}{8}$ , $\frac{1}{2}$ , $\frac{1}{5}$

(1) $\frac{2}{7}$ (2) $\frac{2}{5}$

(3) $\frac{1}{2}$ (4) $\frac{2}{2}$

**50.** Ramesh and Sudha deposited same amount at two different places. Ramesh got interest at 8 p.c.p.a. and Sudha got interest at 7.5 p.c.p.a. If Ramesh has got Rs. 500 more than Sudha, then find the amount that Ramesh had deposited.

(1) Rs. 100000 (2) Rs. 50000

(3) Rs. 7500 (4) Rs. 150000

**51.** Choose the correct option to fill in the box.

932004 – ☐ = 59896

(1) 991900 (2) 927892

(3) 857898 (4) 872108

**SPACE FOR ROUGH WORK**

**48.** 90 च्या सर्व विभाजकांची बेरीज किती?

(1) 233 (2) 228

(3) 204 (4) 234

**49.** दिलेले अपूर्णांक चढत्या क्रमाने मांडल्यास शेवटून दुसऱ्या अपूर्णांकाची दुप्पट किती?

$\frac{1}{4}$ , $\frac{1}{7}$ , $\frac{1}{8}$ , $\frac{1}{2}$ , $\frac{1}{5}$

(1) $\frac{2}{7}$ (2) $\frac{2}{5}$

(3) $\frac{1}{2}$ (4) $\frac{2}{2}$

**50.** रमेश व सुधाने एका वर्षाकरिता सारखी रक्कम वेगवेगळ्या ठिकाणी ठेव म्हणून ठेवली. रमेशला द.सा.द.शे. 8 दराने व सुधाला द.सा.द.शे. 7.5 दराने व्याज मिळाले. जर रमेशला सुधापेक्षा 500 रूपये जास्त मिळाले असेल तर रमेशने किती रक्कम बँकेत ठेव ठेवली होती?

(1) 100000 (2) 50000

(3) 7500 (4) 150000

**51.** रिकाम्या चौकटीत येणाऱ्या योग्य उत्तराचा पर्याय निवडा.

932004 – ☐ = 59896

(1) 991900 (2) 927892

(3) 857898 (4) 872108

**कच्च्या कामासाठी फक्त**

**52.** Rutuja had some amount. She distributed it among 47 students. When she gave Rs. 50 to each student, Rs. 37 were left with her. How much amount did she have?

(1) Rs. 2350 (2) Rs. 2387

(3) Rs. 2313 (4) Rs. 1897

**53.** 2 lakhs + 13 thousands + 72 hundreds + 38 tens + 13 units = ?

(1) 220593 (2) 213733813

(3) 22033813 (4) 220393

**54.** 2 tens + 3 units + 5 hundredth + 8 one tenth = ?

(1) 23.58 (2) 2358

(3) 238.5 (4) 23.85

**55.** Select the incorrect option from the given alternatives.

1 Ream = ________ papers

(1) 20 quires (2) 40 gross

(3) 480 sheets (4) 40 dozen

**56.** The sum of two numbers is 39.62. If one number is 1.259 then what will be the other number?

(1) 2.703 (2) 27.03

(3) 38.361 (4) 40.879

**SPACE FOR ROUGH WORK**

**52.** ऋतुजाजवळ काही रक्कम होती. त्यापैकी प्रत्येक विद्यार्थ्याला 50 रुपये याप्रमाणे 47 विद्यार्थ्यांना वाटले असता, तिच्याजवळ 37 रुपये बाकी राहीले, तर ऋतुजाजवळ किती रक्कम होती?

(1) 2350 रूपये
(2) 2387 रूपये
(3) 2313 रूपये
(4) 1897 रूपये

**53.** 2 लक्ष + 13 हजार + 72 शतक + 38 दशक + 13 एकक = किती?

(1) 220593
(2) 213733813
(3) 22033813
(4) 220393

**54.** 2 दशक + 3 एकक + 5 शतांश + 8 दशांश = किती?

(1) 23.58
(2) 2358
(3) 238.5
(4) 23.85

**55.** खालील पर्यायापैकी कोणता पर्याय अयोग्य आहे ते निवडा?

1 रीम = ............ कागद

(1) 20 दस्ते
(2) 40 ग्रोस
(3) 480
(4) 40 डझन

**56.** दोन संख्याची बेरीज 39.62 आहे. जर एक संख्या 1.259 असेल तर दुसरी संख्या कोणती?

(1) 2.703
(2) 27.03
(3) 38.361
(4) 40.879

**कच्च्या कामासाठी फक्त**

57. What will be the simple interest on the principal of Rs. 5000 at 7 p.c.p.a in 3 years?

(1) Rs. 10500 (2) Rs. 105

(3) Rs. 1500 (4) Rs. 1050

58. Neha walks daily to complete 5 rounds along a triangular ground whose every side is 100m. Then, How much distance does she cover walking around the ground in one week?

(1) 12 km

(2) 3 km 500 m

(3) 14 km 500 m

(4) 10 km 500 m

59. Select the correct option from the following expressions.

(1) $24 - 12 + 3 \times 5 = 27$

(2) $18 - 10 + 3 \times 2 = 2$

(3) $15 \times 12 - 2 + 4 = 176$

(4) $18 + 30 \div 3 \times 2 = 32$

60. Which of the following angles has measured less than $\frac{1}{4}$ times of 360°?

(1) Right angle (2) Obtuse angle

(3) Acute angle (4) Reflex angle

**SPACE FOR ROUGH WORK**

**57.** द.सा.द.शे. 7 दराने 5000 रूपये मुद्दलावर 3 वर्षांचे व्याज किती रूपये होईल?

(1) 10500 रूपये
(2) 105 रूपये
(3) 1500 रूपये
(4) 1050 रूपये

**58.** नेहा दररोज प्रत्येकी 100 मीटर बाजू असलेल्या त्रिकोणाकृती मैदानाला 5 फेऱ्या चालत पूर्ण करते. तर ती एका आठवड्यात मैदानाभोवती किती अंतर चालत पूर्ण करते?

(1) 12 किमी
(2) 3 किमी 500 मीटर
(3) 14 किमी 500 मीटर
(4) 10 किमी 500 मीटर

**59.** खालीलपैकी पदावलीचे योग्य उत्तर असणारा पर्याय निवडा.

(1) $24 - 12 + 3 \times 5 = 27$
(2) $18 - 10 + 3 \times 2 = 2$
(3) $15 \times 12 - 2 + 4 = 176$
(4) $18 + 30 \div 3 \times 2 = 32$

**60.** खालीलपैकी कोणत्या कोनाचे माप $360^\circ$ च्या $\frac{1}{4}$ पटीपेक्षा कमी असते?

(1) काटकोन
(2) विशालकोन
(3) लघुकोन
(4) प्रविशालकोन

**कच्च्या कामासाठी फक्त**

**61.** There are 1600 students in a school. What will be the number of boys in the school, if there are 48% girls?


(1) 768 (2) 832

(3) 52 (4) 640

**62.** Joseph bought 2 pens at the rate of Rs. 12 and 50 paisa and 5 pencils at the rate of Rs. 5 and 25 paisa. How much amount did he spend on his purchase?

(1) Rs. 17.75 (2) Rs. 51.25

(3) Rs. 35.25 (4) Rs. 37.25

**63.**  = How much?

(1) $\frac{127}{84}$ (2) $\frac{7}{14}$

(3) $\frac{127}{14}$ (4) $\frac{1}{2}$

**64.** Double of the common factors of two co-prime numbers is _______.

(1) Smaller of the two co-prime numbers.

(2) Greater of the two co-prime numbers.

(3) 1

(4) 2

**SPACE FOR ROUGH WORK**

**61.** एका शाळेचा एकूण पट 1600 आहे. जर शाळेत 48% मुली असतील तर त्या शाळेतील मुलग्यांची संख्या किती?


(1) 768 (2) 832

(3) 52 (4) 640

**62.** जोसेफने 12 रूपये 50 पैसे या दराने दोन पेन आणि 5 रूपये 25 पैसे या दराने पाच शिसपेन्सिली विकत घेतल्या तर जोसेफने एकूण किती रूपयांची खरेदी केली?

(1) 17.75 रूपये (2) 51.25 रूपये

(3) 35.25 रूपये (4) 37.25 रूपये

**63.** 

(1) $\frac{127}{84}$ (2) $\frac{7}{14}$

(3) $\frac{127}{14}$ (4) $\frac{1}{2}$

**64.** दोन सहमूळ संख्यांच्या सामाईक अवयवाची दुप्पट ........... असते.

(1) दोन सहमूळ संख्यांपैकी लहान संख्या

(2) दोन सहमूळ संख्यांपैकी मोठी संख्या

(3) 1

(4) 2

**कच्च्या कामासाठी फक्त**

**Instruction for Question No. 65 and 66.**

**Solve the questions referring to the pictorial diagram given.**

**Scale : (1  = 20 trees)**

| **Participating schools in tree plantation** | **No. of trees planted** |
|---|---|
| Dnyanda Vidyalaya |  |
| Vidya Niketan School |  |
| Z. P. Primary School |  |
| Sadhana Vidyalaya |  |
| Adarsh Vidyalaya |  |

**65.** How many more trees did Dnyanada Vidyalaya plant than Sadhana Vidyalaya?

(1) 1 (2) 9

(3) 20 (4) 50

**66.** How many trees were planted in all, by the participating schools during the tree plantation programme?

(1) 17 (2) 340

(3) 20 (4) 170

**67.** Eight thousand seven hundred and twelve + Twelve thousand seven hundred and fifty = How much?

(1) 21462 (2) 22462

(3) 20962 (4) 21962

**SPACE FOR ROUGH WORK**

**प्रश्न क्र. 65 व 66 साठी सूचना –**

खालील चित्ररूप माहितीच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(प्रमाण : 1  = 20 झाडे)

| **वृक्षारोपणात सहभागी शाळा** | **लावलेल्या झाडांची संख्या** |
|---|---|
| ज्ञानदा विद्यालय |  |
| विद्यानिकेतन शाळा |  |
| जि.प. प्राथ. शाळा |  |
| साधना विद्यालय |  |
| आदर्श विद्यालय |  |

**65.** साधना विद्यालयापेक्षा ज्ञानदा विद्यालयाने किती झाडे जास्त लावली?

(1) 1 (2) 9

(3) 20 (4) 50

**66.** वृक्षारोपण कार्यक्रमाअंतर्गत सहभागी शाळांनी एकूण किती झाडे लावली?

(1) 17 (2) 340

(3) 20 (4) 170

**67.** आठ हजार सातशे बारा + पावणे तेरा हजार = किती?

(1) 21462 (2) 22462

(3) 20962 (4) 21962

**कच्च्या कामासाठी फक्त**

**68.** Soham exchanged 6 notes of Rs. 2000 with equal number of notes of Rs. 100 and Rs. 50. How many notes of Rs. 100 will he get?

(1) 120 (2) 40

(3) 80 (4) 160

**69.** Using the digits 3, 2, 5, 0, 8 atleast once, a smallest 6 digit odd number is formed. What will be the product of the digits at one's and hundred's place?

(1) 24 (2) 40


(3) 15 (4) 16

**70.** Nisha sold an article at Rs. 1730 which she had purchased at Rs. 1350. How much profit or loss did she make?

(1) Rs. 420 profit (2) Rs. 380 loss

(3) Rs. 420 loss (4) Rs. 380 profit

**71.** A cube is formed by folding the adjoining figure. Which digit will not appear on the cube, to the adjacent side of 4?




(1) 16

(2) 36

(3) 25

(4) 9

**SPACE FOR ROUGH WORK**

**68.** सोहमने 2000 रूपयांच्या 6 नोटा बदलवून 100 रूपये व 50 रूपयांच्या समान नोटा घेतल्या असता 100 रूपयांच्या किती नोटा मिळतील?

(1) 120 (2) 40

(3) 80 (4) 160

**69.** 3, 2, 5, 0, 8 हे अंक प्रत्येकी किमान एकदा वापरून सहा अंकी लहानात लहान विषम संख्या तयार केली असता एकक व शतक स्थानच्या अंकाचा गुणाकार किती?

(1) 24 (2) 40


(3) 15 (4) 16

**70.** निशाने 1350 रूपयांस घेतलेली एक वस्तू 1730 रूपयांस विकली. या व्यवहारात तिला किती नफा की तोटा झाला?

(1) 420 रूपये नफा (2) 380 रूपये तोटा

(3) 420 रूपये तोटा (4) 380 रूपये नफा

**71.** शेजारील आकृती दुमडून घन बनविल्यास 4 हा अंक असलेल्या पृष्ठाच्या लगतच्या पृष्ठावर कोणता अंक येणार नाही?




(1) 16

(2) 36

(3) 25

(4) 9

**कच्च्या कामासाठी फक्त**

**72.** Which of the following statements is FALSE, with respect to triangular numbers and square numbers.

(1) Half the product of 2 consecutive numbers gives a triangular number.

(2) 1 is triangular as well as square number.

(3) When a number is multiplied by the number itself, the result is a square number.

(4) The product of two consecutive numbers is a triangular number.

**73.** What will be the $5^{th}$ number, from left side when the 2 digit numbers divisible by 12 are arranged in descending order?

(1) 60 (2) 12

(3) 48 (4) 36

**74.** Out of 12 km 300 m distance, Afroz covered 9 km 500 m distance on bicycle. She covered the remaining distance running. How much distance, did she cover running?

(1) 2.8 km (2) 2.800 m

(3) 3.200 m (4) 21.800 km

**75.** For a trip in the month of May, Swara booked air tickets in advance for Rs. 5780. Due to some reason, she had to cancel the ticket. She got an amount back with the deduction of 30%. How much loss did she suffer?

(1) Rs. 1734 (2) Rs. 1534

(3) Rs. 1724 (4) Rs. 1504

**SPACE FOR ROUGH WORK**

**72.** त्रिकोणी व चौरस संख्यांच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(1) दोन क्रमवार संख्येच्या गुणाकाराची निमपट केल्यास त्रिकोणी संख्या मिळते.

(2) 1 ही त्रिकोणी आणि चौरस संख्या आहे.

(3) दिलेल्या संख्येला त्याच संख्येने गुणल्यास मिळणारी संख्या चौरस संख्या असते.

(4) दोन क्रमवार संख्याचा गुणाकार केल्यास त्रिकोणी संख्या मिळते.

**73.** 12 ने विभाज्य असलेल्या दोन अंकी संख्या उतरत्या क्रमाने मांडल्यास डावीकडून पाचवी संख्या कोणती?

(1) 60 (2) 12

(3) 48 (4) 36

**74.** अफरोजने 12 किमी 300 मीटर अंतरापैकी 9 किमी 500 मीटर अंतर सायकलने पार केले. उर्वरित अंतर तिने धावत पार केले. तर तिने किती अंतर धावत पार केले?

(1) 2.8 किमी. (2) 2.800 मीटर

(3) 3.200 मीटर (4) 21.800 किमी.

**75.** स्वराने मे महिन्यात सहलीला जाण्यासाठी पुणे ते दिल्ली विमानाचे आगाऊ तिकीट 5780 रूपयांस काढले. परंतु काही कारणामुळे तिने ते तिकीट रद्द केले. तिला 30% रक्कम कपात करून उर्वरित रक्कम मिळाली. तर स्वराला किती नुकसान झाले?

(1) 1734 रूपये (2) 1534 रूपये

(3) 1724 रूपये (4) 1504 रूपये

**<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>**

कच्च्या कामासाठी फक्त